आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२९ मार्च २०२४ - शुक्रवार

गव्हाची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी सरकारनं सर्व छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांना गव्हाचा साठा जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत. किरकोळ आणि घाऊक विक्रेते, मॉल, रिटेल चेन आणि प्रक्रिया करणाऱ्यांना हे साठे १ एप्रिलपासून evegoils.nic.in/wheat या वेबसाइटवर नमूद करावे लागेल. त्यानंतर पुढील आदेशापर्यंत दर शुक्रवारी साठ्यांची माहिती अपडेट करावी लागणार आहे. नोंदणी न केलेल्यांना या वेबसाइटवर नोंदणी करुन साठ्याची माहिती द्यावी लागेल. सध्या तांदळाच्या साठ्याची नोंदणी करणे बंधनकारक आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी काल झाली. राज्यात पहिल्या टप्प्यासाठी पाच मतदारसंघात १८१ पैकी ११० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.  नागपुरात ५३ पैकी २६, भंडारा-गोंदियामध्ये ४० पैकी २२, गडचिरोली-चिमूरमध्ये १२ पैकी १२, चंद्रपूरमध्ये ३५ पैकी १५ आणि रामटेकमध्ये ४१ पैकी ३५ उमेदवारी अर्ज वैध ठरले असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. या टप्प्यासाठी उद्यापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. या मतदारसंघात १९ एप्रिल रोजी मतदान होईल.

रामटेक लोकसभा मतदारसंघातल्या काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरलं आहे. या जागेवर त्यांचे पती श्यामकुमार बर्वे काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार राहणार आहेत.

<><><><><>

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षानं १ वर्ष ८ महिन्यांच्या कालावधीत २१३ कोटी रुपयांहून अधिकचे अर्थसाहाय्य गरजू रुग्णांना वितरीत केलं असल्याची माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांनी दिली.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून अर्थसहाय्य मिळविणं आणि रुग्णालय नोंदणी करणं पूर्णत निःशुल्क असल्याचंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

<><><><><><>

दूरसंचार विभागानं खोट्या कॉल संदर्भात एक मार्गदर्शक सूचना जारी केली आहे. दूरसंचार विभागाच्या नावानं नागरिकांना त्यांचे मोबाईल नंबर बंद केले जातील अशा धमक्या असणारे खोटे कॉल येत असल्याचं दूरसंचार विभागानं म्हटलं आहे. परदेशी मोबाइल नंबरवरून येणाऱ्या फसव्या व्हॉट्सॲप कॉलबद्दल दूरसंचार विभागानं लोकांना जागरूक केलं आहे. सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणूक करण्यासाठी गुन्हेगार अशा कॉलद्वारे वैयक्तिक माहिती चोरण्याचा प्रयत्न करत असून दूरसंचार विभागाकडून असे कॉल केले जात नसल्याचं यात  म्हटलं आहे.

<><><><><><>

आज प्रभू येशू ख्रिस्तांच्या बलिदानाचा दिवस म्हणजेच गुड फ्रायडे आहे. इस्टर संडेच्या आधी येणारा शुक्रवार गुड फ्रायडे असतो. यानिमित्त देशभरात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज गुड फ्रायडेच्या दिवशी येशू ख्रिस्ताच्या बलिदानाचे स्मरण केलं आहे.

<><><><><><>

इंडियन प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं दिल्ली कॅपिटल्सचा १२ धावांनी पराभव केला. राजस्थान रॉयल्सनं २० षटकांत ५ गडी गमावून १८५ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सला ५ गडी गमावून १७३ धावाच करता आल्या.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२९ मार्च २०२४ - शुक्रवार

<><><><><><>

माजी राज्यमंत्री आणि शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या मीनाक्षीताई पाटील यांचं आज सकाळी अल्प आजारानं  निधन झालं. त्या ७६ वर्षांच्या होत्या. मीनाक्षी पाटील यांनी दोन वेळा अलिबाग विधानसभा मतदार संघाचं प्रतिनिधित्व  केलं होतं. मुख्यमंत्री  विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळात त्या राज्यमंत्री होत्या. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या त्या दीर्घकाळ अध्यक्ष होत्या.

<><><><><><>

पोलिसांचा खबऱ्या असल्याच्या संशयावरुन नक्षलवाद्यांनी गडचिरोलीत एका व्यक्तीची हत्या केली. अहेरी तालुक्यातल्या  ताडगाव-दामरंचा रस्त्यावर आज पहाटे ही घटना उघडकीला आली. अशोक तलांडे असं  मृत व्यक्तीचे नाव आहे. गडचिरोली पोलिसांनी काही दिवसापूर्वी केलेल्या कारवाईत ४ नक्षलवादी ठार झाले होते. त्यामुळे नक्षलवाद्यांनी खबरे असल्याच्या संशयावरुन सामान्य नागरिकांना लक्ष्य करणं सुरु केलं  आहे.

<><><><><><>

धुळे शहरात आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागात आज सकाळी अवकाळी पाऊस झाला. या पावसामुळे काही अंशी गारवा मिळाला असला तरी या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचं आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

//<><><><><><>//